ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख २ जानेवारी, १९५७ अंक १

## विविध माहिती

**सुताची सहकारी गिरणी**—नागपूर येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणी काढण्याचें घाटत आहे. गिरणीसाठी ५० लाख रुपयांचें भांडवल लागेल. सहकारी संस्थांच्या व चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधींच्या संयुक्त बैठकींत गिरणी काढण्याचा निर्णय घेण्यांत आला. तपशील ठरविण्यासाठी ७ जणांची कमिटी नेमण्यांत आली आहे.

**मध्य प्रदेशांतील दारुबंदी**—मध्य प्रदेशांत १९६० च्या सुमारास संपूर्ण दारुबंदी अमलांत येण्याचा संभव आहे. भारतीय सरकारला १९५८ पर्यंत संपूर्ण दारुबंदी झाली तर पाहिजे आहे. पण नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलनें राज्य सरकारांना दारुबंदीचा कार्यक्रम टप्प्यानें अमलांत आणण्याची सवलत दिली आहे.

**खाणींसाठीं लागणारी यंत्रसामुग्री**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत देशांतील खाणींमध्यें वापरण्यासाठी ४१·२४ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री लागेल असा अंदाज आहे. जरूर ती यंत्रसामुग्री देशांतच बनविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. यंत्रसामुग्रीची निर्मिति करण्यासाठी एका कंपनीला परवाना देण्याचा विचार चालू आहे.

**वीज निर्मितीचें केंद्र**—जुनागढपासून ६ मैलांवर शहापूर ह्या गांवीं वीज उत्पन्न करणारें नवें केंद्र चालू करण्यांत आलें आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तें बांधण्यांत आलें असून त्यासाठी १·५ कोटी रुपये खर्च आला. केंद्रांतून २,००० चौरस मैल क्षेत्रांतील १५० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत येईल.

**पोर्ट सैद बंदराची दुरुस्ती**—इंग्लंड व फ्रान्सनें इजिप्तवर केलेल्या आक्रमणांत पोर्ट सैद बंदराची व गांवाची बरीच हानि झाली होती. मोडतोड व नासधूस दुरुस्त करण्यासाठी योजना तयार करण्यांत आली आहे. योजनेपैकीं गांवांतील दुरुस्तीचा भाग अमलांत आणण्यासाठीं चार महिन्यांचा अवधी लागेल.

**कॅनडाची भारताला मदत**—१९५० सालापासून कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडा भारताला आर्थिक साह्य करीत आहे. तांत्रिक सहकार्य व भांडवली मदत ह्या दोन प्रकारांनीं साह्य देण्यांत येत आहे. १९५६–५७ च्या आर्थिक वर्षअखेरीपर्यंत भारताला सुमारें ८·१ कोटी डॉलर्सची मदत मिळालेली असेल.

**काजूंच्या कारखान्यांतील कामगार**—त्रावणकोर-कोचीन राज्यांतील कांहीं काजूंचे कारखाने बंद करण्यांत आल्यामुळें गेल्या ऑगस्टपासून १२,००० कामगार बेकार आहेत. ह्या धंद्यांत ४५,००० कामगार काम करतात. मालकांनीं कारखाने पुन्हां उघडण्याचें नाकारल्यामुळें राज्य सरकार आतां कामगारांच्या सहकारी संस्था स्थापून तें चालविण्याचा विचार करीत आहे.

**अमेरिकन विमानांची खरेदी**—भारतीय सरकार अमेरिकेकडून 'बोइंग' जातींची तीन प्रचंड विमानें घेण्याचा विचार करीत आहे. हीं विमानें प्रवाशांच्या वाहतुकीसाठी घेण्यांत येणार असून तीं खरेदी करण्यासाठी जागतिक बँकेकडे कर्जाची मागणी करण्यांत येत आहे. विमानें एअर इंडिआ इंटरनॅशनल कंपनीला देण्यांत येतील. त्यांची किंमत सुमारें ११·५ कोटी रुपये होईल.

**परदेशीय चलनाची खरेदी**—इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाशीं भारताचा जो करार झालेला आहे, त्यामधील शर्तीप्रमाणें भारताला रुपयाचें चलन देऊन ४० कोटी डॉलर्सची खरेदी करतां येईल. तथापि, कोठल्याहि बारा महिन्यांच्या काळांत ही खरेदी १० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक असतां कामा नये असें बंधन आहे. अगदीं जरूर पडल्यास भारताला ह्या हक्काचा उपयोग करतां येईल. अद्याप तशी गरज भासलेली नाहीं.

**सहकारी पद्धतीचा साखर कारखाना**—आंध्रमधील गंगावती ह्या ठिकाणीं सहकारी पद्धतीनें चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्यासाठीं स्थापन केलेल्या सहकारी संस्थेनें १० लाख रुपये भांडवल जमवावयाचें आहे. बाकीचे ८० लाख रुपये फिनॅन्स कॉर्पोरेशन व रिझर्व्ह बँक ह्यांच्यामार्फत मिळावयाचे आहेत.

**क्षयरोगाच्या प्रसाराची चांचणी**—इंडिअन कौन्सिल मेडिकल रिसर्च ह्या संस्थेनें भारतामधील क्षयरोगाच्या प्रसाराची नमुना चांचणी केली आहे. पंजाब, दिल्ली, बिहार, उत्तर-प्रदेश, पश्चिम बंगाल, ओरिसा, आंध्र, मद्रास, म्हैसूर, मुंबई, केरळ व कूर्ग ह्या राज्यामधील लोकांचा चांचणींत समावेश करण्यांत आला होता. भारतामधील ४५ टक्के लोकांना ह्या ना त्या स्वरूपाची क्षयाची बाधा झाल्याचें आढळून आलें.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## डॉ. परुळेकरांच्या 'सकाळ' चा रौप्यमहोत्सव

१ जानेवारी, १९३२ रोजीं 'सकाळ' चा प्रारंभ झाला; म्हणजे १ जानेवारी, १९५७ रोजीं तो २६ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. सकाळचा रौप्यमहोत्सव हा त्याचे संस्थापक व संचालक डॉ. ना. भि. परुळेकर यांच्या सार्वजनिक कार्याचाच रौप्यमहोत्सव होय. म्हणून, ह्या निमित्तानें आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. स्वतंत्र धोरणाचें वृत्तपत्र एकाचानें वैयक्तिक जबाबदारीवर काढून तें यशस्वी करणें, इतकेंच नव्हे तर त्याला संस्थेचें स्वरूप देऊन त्याच्यामार्फत समाजाची सतत सेवा करीत रहाणें आणि सर्व दर्जाच्या, सर्व पेशांच्या, सर्व पक्षांच्या लोकांना तें प्रिय करणें, ही कामगिरी डॉ. परुळेकर ह्यांनीं करून दाखविली आहे. 'सकाळ'च्या वेगामुळें इतर वृत्तपत्रांनाहि अधिक कार्यक्षम बनण्याचा प्रयत्न करणें भाग पडत आहे. हा मराठी वृत्तपत्रसृष्टीचा मोठाच फायदा होत आहे. गृहजीवनावरहि 'सकाळ'च्या वाचनानें अनुकूल परिणाम होत आहे, आणि सार्वजनिक जीवनाची पातळी वाढविण्याचे कामींहि त्याची कामगिरी बहुमोल आहे. 'सकाळ'ला आम्हीं अधिकाधिक यश चिंतितों.

—संपादक

## 'सकाळ'चा पंचविसावा वाढदिवस

दैनिक 'सकाळ' पत्राचा पंचविसावा वाढदिवस १ जानेवारी १९५७ रोजीं मोठ्या प्रमाणांत साजरा झाला. यानिमित्त 'सकाळ' नें आपला 'खास रौप्यमहोत्सवी' अंक प्रसिद्ध केला आहे. यापुढील आयुष्य 'सकाळ'ला याहिपेक्षा भरभराटीचें आणि सुखाचें जावो असें आम्ही इच्छितों.

वृत्तपत्राच्या जीवनाची सत्यकल्पना, स्थिति, सर्वसामान्य जगाला नीटशी असतेच असें नाहीं; आणि त्यांतहि दैनिक पत्रांची स्थिति समजणें कठीण. वृत्तपत्रांचा 'प्राण' म्हणजे जाहिरात आणि लोकाशीर्वाद–पाठिंबा! या गोष्टी पुरेपूर लाभून वृत्तपत्र दीर्घकाल टिकविणें हें देखील एक दिव्यच असतें. वृत्तपत्राच्या या सर्व गोष्टींचा विस्तार करण्याचा करण्याचें कारण हें कीं, वर उल्लेखिलेल्या बाबी 'सकाळ' नें आत्मसात् करून पचवून टाकल्या आहेत. आजचा रोजचा 'सकाळ' खप ३५,००० एवढा आहे. यावरून 'सकाळ' बद्दल पूर्ण कल्पना येईल. यांतहि 'सकाळ' आज स्वयंपूर्ण समर्थ असें जीवन जगत असून त्यानें आपल्या आयुष्याचें पावशतक जिंकलें आहे.

कोणत्याहि ठिकाणीं कर्तत्वगारी, धाडसानें चिकाटीनें करून दाखवावयाची असते. त्याला विद्वत्ता, महत्त्वाकांक्षा, सहकार्य आणि पुरेपूर निष्ठा असेल तर कोणतेंहि कार्य जगमान्यतेस पावतें. लोकांच्या मनांत तें प्रिय होऊन रहातें. 'सकाळ' पत्राच्या विधात्यांच्या ठिकाणीं वरील गोष्टी पुरेपूर वसत असल्यामुळें त्यांनीं वृत्तपत्रीय जगालाच नव्हे तर साऱ्या औद्योगिक महाराष्ट्रीय जगाला एक आदर्शपणाचें आणि आकर्षणीय कार्य आज पुढें ठेवलें आहे. वृत्तपत्रासारखा अनिश्चित आणि अशाश्वत जीवनाचा खेळ खेळून डॉ. नानासाहेब परुळेकरांनीं एक स्पृहणीय धडाडीचा कित्ता नवतरूण उत्साही जगापुढें ठेवला आहे. त्याचा विचार करून केवळ पोकळ विरोधाभक्ति मनांत न बाळगतां 'सकाळ' ला तोडीस तोड निर्माण असा कार्यक्रम हातीं घेऊन तें पूर्ण करण्याचें कामीं पुढें व्हावयास हवें. एवढें जरी आजच्या तरुण जगानें लक्षांत ठेविलें तरी 'सकाळ' व सकाळकारांच्या कर्तबगारी कित्त्याचें चीज होईल असें वाटतें.

पुनश्च एकदां 'सकाळ'ला शुभेच्छा चिंतून हें निवेदन पुरें करतों.

—'सकाळ'चा एक सामान्य वाचक

## ग्रामसेवक व सेक्रेटरी यांचा उजळणी वर्ग

नगर तालुका समाज विकास योजनेच्या कार्यक्षेत्रांत काम करणारे सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी व ग्रामसेवक यांना सोसायट्यांच्या कामकाजाची माहिती देण्याकरितां, नगर जिल्हा सहकारी बोर्डाचे विद्यमानें, ता. २१ ते २३ डिसेंबरपर्यंत एक उजळणी वर्ग घेण्यांत आला.

सदर वर्गास मे. जाधव असिस्टंट प्रोजेक्ट ऑफिसर, नगर, मे. पांगळ असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. अहमदनगर, बँक इन्स्पेक्टर—श्री. सुर्वे, श्री. भोंडे, मामलेदार नगर तालुका श्री. एच्. के. काळे, चेअरमन, नगर जिल्हा सहकारी बोर्ड, इत्यादि अधिकाऱ्यांनीं व कार्यकर्त्यांनीं भेटी देऊन निरनिराळ्या विषयांची व कामाची माहिती देऊन मार्गदर्शन केलें. श्री. जी. डी. देशमुख, को. ट्रे. इन्स्पेक्टर हे या वर्गाचे चालक होते.

## महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी परिषदेची तारीख पुढें ढकलली

नगर जिल्ह्यांत कोपरगांव येथें ता. १६ व १७ जानेवारी १९५७ ला भरणाऱ्या महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी परिषदेची तारीख अपरिहार्य कारणासाठीं एप्रिल १९५७ च्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत स्थगित केली आहे. परिषदेची नक्की तारीख व तिचा कार्यक्रम मागाहून जाहीर करण्यांत येईल. तरी सर्व सोसायट्यांच्या चालकांनीं व कार्यकर्त्यांनीं आपापले ठराव व प्रतिनिधींची वर्गणी C/o धी गोदावरी प्रवरा कॅनॉल्स सहकारी खरेदी-विक्री संघ लि. कोपरगांव, जि. अहमदनगर या पत्त्यावर पाठवावी.

## मिटर रेल्वे गेज डब्यांची दुरुस्ती

१९५२ ते १९५६ च्या दरम्यान रेल्वेबोर्डानें बांधावयास काढलेल्या मिटर गेज डब्यांच्या स्प्रिंगा जास्त वजन पेलण्यास योग्य नाहींत असें रेल्वे हिशेबतपासनीस मंडळानें आपल्या अहवालांत म्हटलें आहे. हे ९०० डबे पुन्हां दुरुस्त करावे लागणार असून त्यासाठीं बराच खर्च येणार आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंकरतां विशेष सुखसोयी असलेले डबे जेव्हां बनविण्यांत आले तेव्हां ते वजनानें २९ ते ३१ टनांचे भरले. परंतु त्याला वापरण्यांत आलेल्या स्प्रिंगा २७ टन वजनांच्या डब्यांना उपयोगी पडतील एवढ्याच दर्जाच्या होत्या. याशिवाय या अहवालांत १८,३६० बाबींचा आणखी उल्लेख करण्यांत आला असून त्याचा नुकसानीचा एकूण आंकडा २४,४०,५४१ रुपयांचा आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २ जानेवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनवर सुएझच्या पेंचप्रसंगाची छाया

ब्रिटननें सुएझ कालवाविभागावर हल्ला करून आपणांवर आर्थिक अरिष्ट ओढवून घेतलें आहे. त्यामुळें नाताळच्या सणावर चिंतेची गडद छाया पडलेली दिसून आली. सणानिमित्त एकमेकांना पाठविण्यांत येणाऱ्या कार्डांवरील शुभेच्छा कांहींशा कृत्रिम व पोकळ भासल्यास त्यांत नवल नाहीं. कारण, तेलाच्या पुरवठ्यांत निर्माण झालेला व्यत्यय आतां जाणवूं लागला आहे. दुसऱ्या महायुद्धांत सुद्धां ब्रिटनला पेट्रोलच्या पुरवठ्याची इतकी विवंचना पडली नव्हती. अमेरिकेनें ब्रिटनला तेलाचा पुरवठा करण्याची तयारी दाखविली आहे खरी; पण अमेरिकेकडून मिळणारा तेलाचा पुरवठा लक्षांत घेऊन सुद्धां ब्रिटिश नागरिकांना आपल्या नेहमींच्या जरूरीपेक्षा ⅓ कमी तेलावर गुजराण करावी लागेल. तेलाच्या पुरवठ्यांत करण्यांत येणारी ही कपात किमान सहा महिने किंवा कदाचित् त्याहिपेक्षा अधिक काळ चालू ठेवावी लागेल असें दिसतें. तेलाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें हजारों कामगारांना संपूर्ण रोजगारी मिळेनाशी झाली आहे. आणखी कांहीं आठवड्यांनीं त्यांना घरींच बसण्याची पाळी येण्याचीहि शक्यता आहे. ह्या चिंताग्रस्त ब्रिटिश नागरिकांत सुएझ कालव्याच्या विभागांतून आलेल्या निर्वासितांची भर पडत आहे. आपल्या नोकरीधंद्याला मुकलेले २,००० ब्रिटिश नागरिक मायदेशीं परतले असून आणखी हजारोंनाहि परतावें लागणार आहे. ह्यांपैकी बरेच जण आज कित्येक वर्षें इजिप्तमध्येंच स्थायिक झालेले होते. ते आणि त्यांचेवर अवलंबून असणारीं माणसें आतां 'निर्वासित' झाली आहेत आणि त्यांना सरकारच्या व व्यक्तींच्या दयाबुद्धीवर अवलंबावें लागत आहे.

इजिप्तमधील घडामोडीमुळें आणखीहि एक परिणाम झाला आहे. ब्रिटनमधील बरेच नागरिक कॅनडा व ऑस्ट्रेलिआ ह्या वसाहतींत जाऊन स्थायिक होण्यास उत्सुक झालेले दिसत आहेत. गेल्या कांहीं आठवड्यांत हजारों ब्रिटिश नागरिकांनीं कॅनडा व ऑस्ट्रेलिआच्या हाय-कमिशनरकडे जरूर तो परवाना देण्यासाठी अर्ज केले आहेत. सुएझच्या पेंचप्रसंगानें त्यांना अनिश्चिततेनें घेरल्यासारखें दिसत आहे. ह्यापुढें ब्रिटनमध्यें आपणास अगर आपल्या मुलांबाळांस आर्थिक उत्कर्षाची संधि मिळणार नाहीं, अशा प्रकारची भावना त्यांच्यांत पसरली आहे. ब्रिटनच्या औद्योगिक आघाडीवरहि खळबळ माजून राहिली आहे. दिवसेंदिवस रहाणीच्या खर्चांत वाढ होऊं लागली आहे. त्यामुळें कामगारांच्या संघटना आपल्या वेतनांत वाढ करण्यांत यावी असे ठराव करीत आहेत. अन्न, वाहतूक आणि इतर जरूरीच्या वस्तू ह्यांच्या किंमती चढत आहेत. कामगार-पुढाऱ्यांनीं आपली भूमिका स्वच्छपणें मांडली आहे. त्यांच्या मतानें किंमती अशाच वाढत गेल्यास नव्या वर्षांत वेतनवाढीच्या मागण्या एकसारख्या करण्यांत येतील. वेतनवाढीच्या मागण्या करण्यांत आल्या तर चलनवृद्धीचा धोका उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं. शिवाय, ब्रिटिश बनावटीच्या मालाच्या किंमती वाढून, परदेशांतील बाजारपेठांत ब्रिटिश मालाला इतरांच्या स्पर्धेला तोंड देणें अवघड होत जाईल. निर्यात व्यापार ब्रिटनच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे. निर्यात व्यापारांत चढत्या किंमतीमुळें घट झाल्यास तेथील आर्थिक परिस्थिति अधिकच तंग होत जाईल.

---

## कुटुंबनियोजनाची आवश्यकता

लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करून संशोधन करणारे डॉ. चंद्रशेखर ह्यांचें हैदराबाद येथील उस्मानाबाद विद्यापीठातर्फे 'लोकसंख्येचे प्रश्न' ह्या विषयावर व्याख्यान झालें. डॉ. चंद्रशेखर ह्यांचा ह्या विषयासंबंधींचा व्यासंग त्यांच्या मताविषयीं आदर वाटावा इतका सखोल आहे. आपल्या देशांत लोकसंख्येची जी भराभर वाढ होत आहे तीला आळा घालावयाचा असेल तर कुटुंबनियोजन हाच एक उपाय आहे असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. ते पुढें म्हणाले कीं, १५ पासून ४४ वर्षें वयाच्या व दोन अगर अधिक मुलें असलेल्या स्त्रियांची ह्या विषयासंबंधानें मतें अजमावण्यांत आलीं असतां, त्यांच्यामधील ६७ ते ७४ टक्के स्त्रियांचीं मतें कुटुंबनियोजनाला अनकूल असल्याचें दिसून आलें. भारतीय सरकारनें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंबनियोजनाच्या कार्यासाठी ६·१ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पांच कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आलेली आहे. कोठलीहि सुधारणा करावयाची म्हटलें कीं त्यासाठी सरकारच्या तोंडाकडे पहावें लागतें अशी आपली सामाजिक परिस्थिती आहे, ही गोष्ट दुर्दैवाची आहे. कुटुंबनियोजनाच्या बाबतींत लोकांनीं जर सामुदायिक रीत्या मागणी केली तर सरकारला ती मान्य करावीच लागेल. भारताचें औद्योगिकरण जर झपाट्यानें करण्यांत आलें तर त्यामुळें लोकांच्या जीवनमानांत वाढ होत जाईल. भारतांतील उद्योगधंद्यांना तीस वर्षें पुरेल इतका कच्चा माल देशांत आहे. तेव्हां लोकांची खरेदीची शक्ती जर वाढविण्यांत आली तर देशांत उत्पन्न होणाऱ्या मालाला बाजारपेठ कोठून आणावी हा प्रश्न उत्पन्न होण्याचें कारण दिसत नाहीं.

---

## पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणी

मध्य प्रदेशामधील पन्ना ह्या ठिकाणीं असलेल्या हिऱ्यांच्या खाणीं आपल्या मालकीच्या करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. खाणींचा विकास करण्यासाठी शक्य तितकें अधिक यंत्रसाहित्य वापरण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे. खाणींची पहाणी करून रशिअन तंत्रज्ञांनीं जो अहवाल सादर केला त्यांतील शिफारसींच्या अनुरोधानें हा निर्णय घेण्यांत आला आहे. मध्य-प्रदेशाचे नैसर्गिक साधनांचे मंत्री श्री. शंभुनाथ शुक्ल ह्यांनीं अशी माहिती दिली आहे कीं, खाणींच्या यांत्रिकीकरणासाठी ५ कोटी रुपयांचें भांडवल लागेल आणि तें सर्व मध्यवर्ती सरकारच पुरविणार आहे. सध्या ह्या खाणींच्या विभागांत खाजगी उद्योगपती हिऱ्यांच्या निर्मितीचें काम करीत आहेत. त्यांना नुकसानभरपाई

देण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. नुकसानभरपाईचा प्रश्न सुटल्यानंतर सरकार खाणी आपल्या ताब्यांत घेईल. पन्ना येथील खाणींत दोन खाणी विशेष उत्पादक आहेत. ह्या खाणींचा विस्तार २४ चौरस मैलांवर पसरलेला असून भारताच्या हिऱ्यांच्या उत्पादनापैकीं ९० टक्के उत्पादन त्यांतून होतें. पूर्वीं हा भाग विंध्यप्रदेशाच्या हद्दींत होता. राज्यपुनर्रचनेच्या आधींच्या विंध्यप्रदेशांत आणखीहि कांहीं हिऱ्याच्या खाणी आहेत असें आढळून आलें आहे. ह्या खाणींतून ५०० कोटी रुपयांचे मूल्यवान् खडे निघूं शकतील, असा अंदाज करण्यांत आला आहे. पन्ना येथील खाणी शास्त्रीय रीत्या चालविण्यांत आल्या तर रोज १,८९५ कॅरेट्स वजनाचे हिरे निघूं शकतील असा अंदाज रशिअन तज्ज्ञांनीं केला आहे. आंध्रमधील गोवळकोंड्या-जवळील खाणींचीहि पहाणी ते करणार आहेत.

---

### सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री

असोशिएटेड सिमेंट कंपनीचे अध्यक्ष श्री. धरमसी खटाव ह्यांनीं दक्षिण भारतामधील एका सिमेंटच्या कारखान्याच्या कामगारांसमोर भाषण केलें. ते म्हणाले कीं, भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस देशांतील सिमेंटचें उत्पादन दरसाल १·२ कोटी टनांपर्यंत जावें अशी सरकारची अपेक्षा आहे. ज्या वेळेला हें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें त्यावेळीं तें आवाक्याबाहेरचें वाटलें. पण १९६०–६१ च्या सुमारास भारतामधील सिमेंटचा वाढणारा खप लक्षांत घेतां उद्दिष्ट कमीच वाटतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंटचें उत्पादन तर ३ कोटी टनांपर्यंत ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. १९६० अखेर ठरविण्यांत आलेल्या उत्पादनापेक्षा हें उत्पादन २॥ पटीनें अधिक आहे. उत्पादनाच्या अपेक्षेचे हे अंदाज बरेच उच्च वाटतात. पण भारतामधील सिमेंटचा खप इतक्या झपाट्यानें वाढत आहे कीं त्याच्या खपाचा खरा अंदाज वर्तविणें कठीण आहे. देशांतील गरज जसजशी वाढत आहे त्या प्रमाणांत सिमेंटचा खपहि वाढत जाणें अपरिहार्य आहे. ३ कोटी सिमेंटचा खप झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. इतकें सिमेंट खपलें तरीसुद्धां त्याच्या खपाचें दरडोई प्रमाण अगदीं अल्पच भरेल. सिमेंटच्या उत्पादनांत वाढ करणें भारतामधील कारखान्यांना कितपत शक्य होईल, हा प्रश्न निराळा आहे. असोशिएटेड सिमेंट कंपनीनें, ब्रिटनमधील व्हिकर्स कंपनीशीं भागीदारी करून सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री तयार करण्याचा एक प्रचंड कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांत इतर मोठी यंत्रसामुग्रीहि तयार करण्यांत येईल.

---

**कोळ्यांना शिक्षण देणारें केंद्र**—सौराष्ट्रांत वेरावळ बंदरांत स्थानिक कोळ्यांना यांत्रिक साधनानें मच्छीमारी करण्याचें शिक्षण देण्याचें केंद्र उघडण्यांत आलें आहे. एंजिनावर चालणाऱ्या चार बोटी आणि देशी पद्धतीचीं १०० तारवे शिक्षणासाठी वापरण्यांत येणार आहेत. एंजिनाच्या बोटींवर ४ जपानी तज्ज्ञ काम करणार आहेत. हें केंद्र कोलंबो योजनेखालीं सुरू करण्यांत आलें आहे.

**कामगारांना बोनस**—जामनगरजवळ सिक्का येथें असलेल्या दिग्विजय सिमेंट कंपनीच्या कामगारांना ३ महिन्यांचें वेतन-बोनस म्हणून मिळणार आहे. हा बोनस १९५५ सालचा आहे. कंपनीचे चालक व कामगारसंघाचे चिटणीस ह्यांनीं वाटाघाटी करून बोनसचा प्रश्न निकालांत काढला.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. वा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## भाडेकऱ्याकडून देणें निघत असलेलें भाडें

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

अमीर कासम भगवान हा एक घरमालक असून रामराव रावजी पालकर हा बरेच वर्षांपासून त्याचा भाडेकरी होता. महिना १० रुपये याप्रमाणें घरभाडें रामरावनें देण्याचें कबूल केलें असून ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून त्याच्याकडे भाडें थकलें आहे या सबबीवर त्याला घरांतून घालवून देण्याकरितां अमीर कासम भगवाननें नोव्हेंबर १९५२ मध्यें दावा आणला. घराचें स्टँडर्ड भाडें ४ रुपये असून सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर १९५२ असें फक्त तीन महिन्यांचें भाडें थकलें आहे असें रामरावचें म्हणणें होतें.

घराचें स्टँडर्ड भाडें महिना ६ रुपये असून तें द्यावयास भाडेकरी तयार नसल्यामुळें थकलेल्या भाड्यासहित घरमालकाला घराचा कबजा मिळावा अशी अव्वल कोर्टानें डिक्री दिली. यावर रामरावनें डिस्ट्रिक्ट कोर्टांत अपील केलें. घराचें स्टँडर्ड भाडें मासिक ७ रुपये असून ऑगस्ट १९४७ पासून तें भाडें थकलेलें आहे असें डिस्ट्रिक्ट जज्जाला आढळून आलें. महिना ७ रुपये-प्रमाणें १५ ऑगस्ट १९४७ पासून सर्व थकलेलें भाडें जर रामरावनें दिलें तर त्याला घरांतून काढून टाकण्याबद्दलची डिक्री रद्द करण्यांत येईल असा निकाल डिस्ट्रिक्ट जज्जानें दिला. यावर रामरावनें हायकोर्टांत रिव्हिजन–अर्ज केला.

हायकोर्टांत रामरावतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, प्रस्तुत केसमधील दाव्याच्या तारखेस म्हणजे ता. ३ नोव्हेंबर १९५२ रोजीं ज्या भाड्याची वसुली मुदतीच्या कायद्यामुळें मुदतबाह्य झालेली आहे असें भाडेंसुद्धां रामरावनें घरमालकाला द्यावें हा डिस्ट्रिक्ट जज्जाचा निकाल चुकीचा होता.

मुंबई भाडें नियंत्रण कायद्याच्या ( Bombay rents, Hotel and Lodging House Rates Control Act, 1947 ) कलम १२ (३) (ब) चा आशय असा आहे कीं, घरमालकानें भाडेकऱ्याकडे भाडें थकल्यामुळें त्याला घरांतून घालवून देण्याकरितां आणलेल्या दाव्यांत त्या तारखेपर्यंत भाडेकऱ्याकडून देणें निघत असलेलें सर्व भाडें जर भाडेकऱ्यानें कोर्टांत जमा केलें तर भाडेकऱ्याला घरांतून घालवून देण्यासंबंधीची डिक्री घरमालकाला मिळणार नाहीं.

'देणें निघत असलेली रक्कम' या शब्दप्रयोगाचे दोन अर्थ निघूं शकतात. कांहीं कायद्यामध्यें "देणें निघत असलेली रक्कम" या शब्दप्रयोगाचा अर्थ व्यापक आहे. देणें निघत असलेली परंतु मुदतीच्या कायद्यामुळें जिची वसुली मुदतबाह्य झालेली आहे अशा रकमेचा सुद्धां त्या शब्दप्रयोगांत समावेश होतो. कांहीं कायद्यांमध्यें मात्र जी रक्कम मुदतबाह्य झालेली नाहीं अशाच रकमेचा समावेश त्या शब्दप्रयोगांत केलेला आहे.

मुंबई भाडें नियंत्रण कायद्याच्या कलम १२ (३) (ब) मध्यें "त्या तारखेस भाडेकऱ्याकडून देणें निघत असलेलें भाडें" हा शब्दप्रयोग कोणत्या अर्थी वापरला आहे हें आपणांस पहावयाचें आहे.

मुंबई भाडेनियंत्रण कायद्याच्या क. १२ चा उद्देश जे भाडेकरी त्यांचेकडून देणें निघत असलेलें भाडें देऊन टाकण्यास तयार असतील अशा भाडेकऱ्यांनाच मदत देण्याचा आहे. जे भाडेकरी त्यांचेकडून देणें निघत असलेलें भाडें देण्यास तयार नसतील त्यांना क. १२ ची मदत मिळणार नाहीं. कलम १२ चा हा उद्देश ध्यानांत घेतला असतां क. १२ (३) (ब) मधील "त्या तारखेस भाडेकऱ्याकडून देणें निघत असलेलें भाडें" या शब्दप्रयोगाचा अर्थ स्पष्ट होईल. "त्या तारखेस देणें निघत असलेलें भाडें" या शब्दप्रयोगांत जें भाडें भाडेकरी देणें लागतो परंतु मुदतीच्या कायद्यामुळें ज्या भाड्याची वसुली मुदतबाह्य झालेली आहे अशा भाड्याचासुद्धां समावेश होता. डिस्ट्रिक्ट कोर्टाचा निर्णय बरोबर होता असा निकाल देऊन हायकोर्टानें रिव्हिजन नामंजूर केली.

भाडेकऱ्याकडे भाडें थकल्यामुळें त्याला घरांतून घालवून देण्याकरितां घरमालकानें आणलेल्या दाव्यांत दाव्याच्या तारखेपर्यंत त्याच्याकडून देणें निघत असलेलें सर्व भाडें जर भाडेकऱ्यानें कोर्टांत जमा केलें तर त्याला घरांतून घालवून देण्यासंबंधींची डिक्री घरमालकाला मिळणार नाहीं. "भाडेकऱ्याकडून देणें निघत असलेलें भाडें" या शब्दप्रयोगांत जें भाडें भाडेकरी देणें लागतो परंतु मुदतीच्या कायद्यामुळें ज्या भाड्याची वसुली मुदतबाह्य झालेली आहे अशा भाड्याचासुद्धां समावेश होतो.

—न्यायबोध, डिसेंबर, १९५६.

---

### रोगराईविरुद्ध मोहीम संपलेली नाहीं

रोगांचें निर्मूलन करण्यासाठीं अलीकडील कांहीं वर्षांत नवीं-नवीं प्रभावी औषधें निघत आहेत. तज्ज्ञ डॉक्टर्सच्या सल्ल्यानें वापरल्यास तीं परिणामकारकहि ठरतात. असें असले तरी रोगां-विरुद्ध चाललेली वैद्यकीय शास्त्राची लढाई जिंकली गेली आहे असें मात्र नाहीं. ब्रिटनच्या आरोग्यखात्याचे प्रमुख अधिकारी मि. जॉन चार्लस ह्यांनीं आपल्या वार्षिक अहवालांत नव्या रोगांच्या उद्भवाविषयीं इषारा दिलेला आहे. अहवालांतील माहितीवरून असें दिसून येतें कीं ब्रिटनमध्यें अशुद्ध पाणी अगर दूध ह्यांच्या योगानें होणाऱ्या सांथीच्या रोगांचें जवळ जवळ निर्मूलन झालेलें आहे. ह्या दोन वस्तूंच्या बाबतींत जी खबरदारी घेण्यांत येते तिचा हा परिणाम आहे. ही झाली एक बाजू; पण दुसऱ्या बाजूनें अन्नपदार्थांपासून होणाऱ्या रोगांत वाढ झालेली दिसून येते. अन्नापासून विषबाधा झाल्याचीं उदाहरणें वाढत चाललेलीं आढळून आलीं. ब्रिटनमध्यें शिजवलेल्या मांसाचे हवाबंद डबे वापरण्याची पद्धत आहे. ह्या मांसाचे उपयोग करणें गृहिणींच्या दृष्टीनें सोयीचें असतें. पण त्यामुळें नवे रोग प्रसृत होत आहेत. अंड्यापासून बनविलेले जे पदार्थ बाजारांत मिळतात त्यांचीहि अशीच कथा आहे. औद्योगिक-दृष्ट्या प्रगत झालेल्या देशांत रहाणीची जी पद्धत रूढ झाली आहे तीमुळें क्षय अगर हिंवताप ह्यासारखे रोग नाहींसे झाल्याचें दिसतें. पण त्यांची जागा नवीन रोग घेतात किंवा काय अशी शंका घेतली जात आहे. अमेरिकेंतील अनुभव असा आहे कीं 'पोलिओ' हा रोग ज्या ठिकाणीं आधुनिक आरोग्यविषयक उपाय तत्परतेनें योजले जातात त्या ठिकाणीं आढळून येतो.

---

**हंगेरीला कर्ज नाहीं**—सोव्हिएट रशिआच्या मदतीनें अधिकारावर आलेल्या हंगेरीच्या सरकारकडून जागतिक बँकेकडे १० कोटी डॉलर्सच्या कर्जाची मागणी करण्यांत येणार असल्याच्या वार्ता पसरल्या होत्या. पण बँकेचे अध्यक्ष मि. ब्लॅक ह्यांनीं हंगेरी देश बँकेचा सभासद नसल्यानें अशा मागणीचा विचार करतां येणार नाहीं असें जाहीर केलें आहे.

**खेळाच्या सामानाचे कारखाने**—खेळांसाठीं लागणारें सामान तयार करण्यासाठीं छोट्या कारखान्यांना तांत्रिक मदत देणारीं दोन केंद्रें स्थापन करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्यांपैकी एक केंद्र मीरत येथें व दुसरें जालंदर येथें स्थापन करण्यांत येईल. भारतांत खेळांचें सामान तयार करणारे छोटे कारखाने दरसाल १ कोटी रुपयांचा माल तयार करतात.

**कायद्याचें हिंदी मासिक**—बनारस येथील काशी नागरी प्रचारिणी सभेनें हिंदी भाषेंतील कायद्याविषयक पहिलें मासिक प्रसिद्ध करण्यास सुरवात केली आहे. मासिकाचें नांव 'विधिपत्रिका' असें आहे. पहिल्या अंकाचें प्रकाशन सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश न्या. भवानीशंकर ह्यांच्या हस्तें झालें.

**जपानकडून यंत्रसाहित्याची खरेदी**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं लागणाऱ्या बऱ्याच मोठ्या यांत्रिक साहित्याची मागणी जपानमधील कारखान्यांकडे नोंदण्यांत आली आहे. ह्या औद्योगिक मालांत रेल्वेसाठीं लागणारें साहित्य व विजेच्या निर्मितीसाठीं लागणारें साहित्य, ह्यांचा अंतर्भाव आहे.

**पुस्तकांची देणगी**—दिल्ली येथें भरलेल्या आशिआमधील लेखकांच्या परिषदेच्या वेळीं रशिआनें परिषदेच्या कार्यकारी समितीला १०० पुस्तकें भेट म्हणून दिलीं. ह्या पुस्तकांत रविंद्रनाथ टागोर, पंतप्रधान नेहरू, डॉ. राधाकृष्णन् आणि प्रेमचंद ह्या हिंदी लेखकांच्या पुस्तकांचीं रशिअन भाषेंतील भाषांतरें आहेत.

**ब्रह्मचाऱ्यांची करांतून सुटका**—हंगेरीच्या सरकारनें चालू वर्षापासून ब्रह्मचारी लोक आणि अपत्यहीन जोडपीं ह्यांच्यापासून घेण्यांत येणारा खास कर रद्द केला आहे. हंगेरींत नुकत्याच झालेल्या बंडाच्यापूर्वी सरकारकडे ज्या मागण्या करण्यांत येत होत्या त्यांत वरील कर रद्द करण्याची एक मागणी होती.

**दातांचा फिरता दवाखाना**—मद्रास मेडिकल कॉलेजला झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें दंतवैद्यकाला उपयोगी पडेल अशी एक सुसज्ज मोटार-बस देणगी म्हणून दिली आहे. मोटारींत दातांसंबंधी करावयाच्या उपचारास उपयोगी पडेल अशी सर्व सामुग्री आहे. स्वतंत्रपणें वीज उत्पन्न करण्याची सोय असल्या-मुळें ग्रामीण भागांतहि तिचा चांगला उपयोग होईल. मोटारीची किंमत ३ लाख रुपये आहे.

**हिराकूद धरणाचें उद्घाटन**—ओरिसामधील हिराकूद धरणाचें उद्घाटन पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू ता. १३ जानेवारी रोजीं करणार आहेत. ह्या योजनेचा पहिला टप्पा आतां पुरा झालेला असून त्यासाठीं ७१ कोटी रुपये खर्च झाला आहे. महानदीवर बांधलेल्या ह्या धरणाची लांबी तीन मैल आहे.

**विजेच्या वापरावर मर्यादा**—मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांनीं आपल्या निवासस्थानीं किती वीज वापरावी, ह्याविषयीं कमाल मर्यादा घालण्यांत येणार असल्याचें समजतें. मंत्र्यांच्या बंगल्यांतून वापरण्यांत येणाऱ्या विजेचा आकार वाढत चाललेला दिसून आल्यामुळें लोकसभेंत विरोधी पक्षाच्या सभासदांनीं टीका केली होती.

**भारताची पौंडी गंगाजळी**—ब्रिटनकडे असलेल्या भारताच्या पौंडी गंगाजळींतून भारत दर आठवड्याला ३० लाख पौंड काढीत आहे अशी माहिती लंडनमधील भारतीय हायकमिशनरच्या एका प्रवक्त्यानें सांगितली आहे. भारताची एकूण गंगाजळी सध्यां ४० कोटी पौंडांची आहे. त्यांपैकी किमान ३० कोटी पौंड हिंदी चलनासाठीं तारण म्हणून ठेवावे लागतात.

**फायरस्टोन कंपनी**—फायरस्टोन कंपनीच्या नोकरांना ६ महिन्यांचा बोनस देण्याबद्दल लेबर अॅपेलेट ट्रिब्युनलनें सुचविलें आहे. हा निर्णय इंडस्ट्रियल कोर्टानें दिलेल्या निकालांत बदल करून देण्यांत आला आहे. इंडस्ट्रियल कोर्टानें ५ महिन्यांच्या बोनसची शिफारस केली होती. त्याविरुद्ध कामगारांनीं केलेल्या अपिलाचा निर्णय वरीलप्रमाणें लागला आहे.

**धरणासाठीं कॅनडाची मदत**—भारतीय सरकार आणि कॅनडाचें सरकार ह्यांच्या दरम्यान आर्थिक साह्याच्या एका करारावर सह्या करण्यांत आल्या. मद्रास राज्यांतील कुंडा धरण-योजनेसाठीं व वीजकेंद्रासाठीं कॅनडाकडून २ कोटी डॉलर्सपर्यंत रक्कम कराराप्रमाणें मिळणार आहे. मद्रास राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील ही सर्वांत मोठी योजना आहे. योजनेसाठीं ३० कोटी रुपये खर्च येईल.

**जर्मनींत हिंदीबद्दल आस्था**—जर्मनीमधील म्युनिच शहरांतील माध्यमिक शाळांतून हिंदी भाषेचा अभ्यासक्रम ऐच्छिक म्हणून ठेवण्यांत आला आहे. जर्मनींत हिंदी भाषा शिकण्याची नागरिकांची इच्छा वाढत चाललेली दिसून येत आहे. जर्मनी-मधील कांहीं विद्यापीठांतून हिंदी शिकवण्याची सोय ह्यापूर्वीच करण्यांत आली आहे.

**रशिअन बोटींची मदत**—सुएझ कालव्यांतील अडथळे काढून टाकण्याच्या कामास सुरवात करण्यांत आली आहे. कालवा वाहतुकीसाठीं खुला होण्यास १० आठवडे लागतील असा अंदाज संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तज्ज्ञांनीं केला आहे. कालवा साफ करण्या-साठीं वापरण्यांत येणाऱ्या खास बोटींत ब्रिटिश, फ्रेंच, डॅनिश, डच, रशिअन व जर्मन बोटी आहेत.

**सरकारी नोकरांची सोय**—मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ येथें रहात्या घरांची टंचाई आहे. राज्य-सरकारच्या तिसऱ्या व चौथ्या श्रेणींतील नोकरांना रहाण्यासाठीं २,००० नवीं घरें बांधण्यांत येणार आहे. हें काम हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यांत आलें आहे. बांधकामाचा खर्च १·२७ कोटी रुपये होईल.


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

मराठी मासिक सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाकरितां

नवा हिंदु वारसा कायदा

( १९५६ चा )

लेखक : विठ्ठल रामचंद्र फडके, एम्. ए., एलएल्.बी., वकील ( रि. सि. जज्ज ) पुणें.

हिंदु स्त्री-पुरुषांच्या वारसा हक्कांत, मिळकतीवरील स्त्रियांच्या हक्कांत व मृत्युपत्र करण्याच्या हक्कांत झालेले क्रांतिकारक बदल सोप्या भाषेंत समजावून देणारें हें एक-मेव पुस्तक प्रकाशकाकडे व सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल. [ किंमत १॥ रुपया, शिवाय टपालखर्च ]

प्रकाशक : हे. वि. फडके,
श्रीकृष्णकुंज, ८२० भां. इं. रोड, पुणें ४.

# पश्चिम महाराष्ट्राचा औद्योगिक विकास

लेखक . श्री. म. ना. गोमटे, बी. एस्सी. ( ऑनर्स )
बी. एस्सी. (टेक्)

राज्यपुनर्रचनेनंतर नव्या द्विभाषिक मुंबई राज्यांत भारतांतील सर्व मराठी मुलूख प्रथमच एका छत्राखाली आला आहे. या मराठी प्रदेशाचे विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई व पश्चिम महाराष्ट्र असे तीन प्रमुख विभाग पडतात. जुन्या मुंबई राज्यांतील मुंबई शहर व मराठी विभाग मिळून होणाऱ्या प्रदेशास सोईचे दृष्टीनें "पश्चिम महाराष्ट्र" असें संबोधणें इष्ट होईल. या लेखामध्यें सदर पश्चिम महाराष्ट्र विभागाची सद्यःस्थिति व विकासक्षमता यांचा विचार केला आहे.

## मिश्र अर्थव्यवस्था

भारत सरकारची नीति "समाजवादी समाजरचना" निर्माण करण्याच्या दिशेनें पावलें टाकीत आहे. समाजांतील सर्व थरांतील जनतेचें जीवनमान वाढवून तें क्रमाक्रमानें इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या निर्देशांकांचे जोडीला नेऊन पोहोंचविणें हें भारताचें अंतिम ध्येय होय. जनतेची राहाणी सुधारणें व बेकारीला आळा घालणें या दृष्टीनें भरपूर वेतनावर सर्वांना काम मिळवून देण्याची सरकारवर मोठी जबाबदारी आहे, व यामुळें उद्योगधंद्यांची जलद वाढ होणें क्रमप्राप्तच आहे.

याच कारणास्तव सरकारनें सरकारी उद्योगधंदे (Public Sector Industries) व खाजगी उद्योगधंदे (Private Sector Industries) अशी उद्योगधंद्यांची वांटणी केलेली आहे. दोन्हीहि तऱ्हेच्या उद्योगधंद्यांची वाढ दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पांच हजार कोटी रुपयांपेक्षाहि अधिक अशा अवाढव्य खर्चासाठी कर व अन्य मार्गांनीं पैसा उभा करणें व दुसरीकडे खाजगी उद्योगधंद्यांच्या वाढीला सवलती देऊन पोषक अशी परिस्थिति निर्माण करणें अशी तारेवरील कसरत सध्यां राज्यकर्त्यांना करावी लागत आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिति व निसर्गप्रकोप यांचे आघातहि वरचेवर होतच आहेत. मात्र या महान राष्ट्रमंथनांतून अखेर समृद्धि व सौख्यरूपी श्रेष्ठरत्नें आपले हातीं येतील अशी जनतेची दृढ श्रद्धा आहे.

या संमिश्र अर्थव्यवस्थेंत खाजगी उद्योगधंद्यांनीं पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील आपला वांटा उत्कृष्ट रीतीनें पुरा केला हें सर्वज्ञात आहेच. येवढेंच नव्हे तर मोटारी, रंग, रसायनें, औषधी रसायनें, रेल्वेचे डबे-वाघिणी, गिरणीची यंत्रसामुग्री व मशीन-टूल्स इत्यादि अनेक नव्या क्षेत्रांतहि त्यांनीं पदार्पण केलेलें दिसून येतें. तेव्हां दृढनिश्चयानें व योजनाबद्ध सुसंघटित रीतीनें अंमलबजावणी केल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीहि यशस्वी पूर्तता होईल असा विश्वास वाटतो.

## शेतीची वाढ

अंतिम उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीनें व्यापार व उद्योगधंदे यांचे जोडीला शेतीची सुसंघटित व योजनाबद्ध वाढ होणें हें आपल्यासारख्या शेतीप्रधान देशांत आवश्यकच आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्यें गिरणा, मुळा, वीर व खडकवासला अशा नव्या मोठ्या धरण-कालव्यांच्या योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केल्या आहेत. नाशिक जिल्ह्यांत गंगापूर योजना तयार झाली आहे. या सर्व योजना पूर्ण झाल्यावर सुमारें १२ लाख एकर जमीन भिजणार असून त्या प्रमाणांत शेतीचें उत्पादन वाढेल. या दृष्टीनें जलसिंचाईच्या आणखी कोणत्या योजना प. महाराष्ट्रांतील दुष्काळी विभागांत करतां येतील त्याची पहाणी व्हावी. निसर्गाच्या लहरीपणावर अशा योजनांनींच आळा घालतां येईल.

साखर—उंसाच्या पिकाचें विपुल उत्पन्न ही कालव्याच्या पाण्याची पश्चिम महाराष्ट्राला प्रमुख देणगी होय. यामुळें प. महाराष्ट्रांत सध्यां एकूण १४ साखरकारखाने चालू असून नवीन पाणीपुरवठा योजनांच्या आधारावर सहकारी पद्धतीचे १२ नवे कारखाने येत्या दोनतीन वर्षांत चालू होतील. सध्यां उंसाचें लागवडीखाली सुमारें १ लक्ष एकर जमीन असून हें क्षेत्रफळ नवीन जलसिंचाईमुळें दीडपट होईल अशी अपेक्षा आहे. सध्यां १४ साखर कारखान्यांतून सुमारें दीड कोटी रुपये किंमतीची पावणेदोन लाख टन साखर उत्पन्न होते. नवीन १२ कारखाने झाल्यावर हेंच उत्पादन अडीच लाख टन होईल. ही साखर बनवितांना मिळणारी मोलॅसिसूची मळीहि दुप्पटीनें वाढेल व त्यापासून पॉवर-अल्कोहोल बनविण्याचे कारखाने काढणें शक्य होईल. एकंदरींत साखरनिर्मितीस प. महाराष्ट्रामध्यें बराच वाव आहे व कालांतरानें या क्षेत्रांत प. महाराष्ट्र भारतांत अग्रेसरत्वहि मिळवूं शकेल.

कापूस व कापड—पश्चिम महाराष्ट्रांतील पूर्व व पश्चिम खानदेश, अहमदनगर, सोलापूर, नाशिक वगैरे जिल्ह्यांत कापूस होतो. या पिकाखालील सुमारें ९ लक्ष एकर जमिनीपासून दरसाल अंदाजें २॥ लक्ष गांठी कपाशीचें उत्पादन होतें. या बाबतींत शेतकीखात्यानें संशोधन करून लांब धाग्याचा व उत्तम प्रतीचा कापूस पिकविण्याचे दृष्टीनें मार्गदर्शन केलें पाहिजे. कापडाचें एकंदर उत्पादन वाढविण्याचे दृष्टीनें ज्या भागांत कापसाची पैदास होते त्याच भागांत जागोजाग मध्यम व लहान प्रमाणाचें सुत कांतण्याचे व कापड विणण्याचे कारखाने काढण्यास सरकारनें प्रोत्साहन दिलें पाहिजे. "काळे ऑटोस्पिनर" अगर "गुप्ते स्पिनिंग मशीन" हीं अवघ्या १।२ अश्वशक्तीवर चालणारीं यंत्रें असून त्यांच्या उपयोगाला उत्तेजन मिळालें पाहिजे. असें केल्यानें ग्रामीण विभागांत जागोजागीं लोकांना कामें मिळून कच्चा व पक्का माल वाहतुकीचा त्रास व खर्च वाचेल, आणि कापडाच्या स्थानिक गरजा तेथल्या तेथेंच भागूं शकतील. प. महाराष्ट्रांत सध्यां सुमारें २९,००० हातमाग व ५,४०० पॉवर लूम्स आहेत. निदानपक्षीं त्यांची जाड्या धाग्याची गरज अशारीतीनें भागण्यासारखी आहे.

तेलबिया—प. महाराष्ट्रांत भुईमूग व इतर तेलबियांचें उत्पादन मोठें असून गांवोगांव तेलघाणे चालतात. अधिक तेल देणाऱ्या तेलबियांच्या जाती व त्यांचे दर एकरीं उत्पादन वाढविण्याचे दृष्टीनें संशोधन व मार्गदर्शन होणें आवश्यक असून यंत्रशक्तीवर चालणारे घाणे गांवोगांव बसविले पाहिजेत. या केंद्रांतून भरपूर पेंड मिळते. या पेंडीपासूनहि Solvent extraction पद्धतीनें तेल काढण्याचे कारखानें निघाले पाहिजेत. जवसाच्या तेलापासून रंगाचे व इतर पदार्थांचे लहानसहान उद्योगधंदे निघूं शकतील. साबणाचे व वनस्पती तुपाचेहि कारखाने ग्रामीण विभागांतील तेलबियांच्या केंद्रांत काढतां येतील.

अन्नधान्यें—प. महाराष्ट्राच्या पूर्व विभागांत गहूं व मका, पश्चिम विभागांत तांदूळ आणि मध्य विभागांत ज्वारी, बाजरी यांची पैदास होते. जपानी पद्धतीच्या भातशेतींत उत्पादन दुणावतें, अशाच्रुरीतीनें शेतकी खात्यानें येथील भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन संशोधन व मार्गदर्शन केल्यास

एकरीं उत्पादन चांगल्या प्रमाणांत वाढण्याची शक्यता आहे. मक्यापासून स्टार्च व ग्लुकोज यांचें उत्पादन करणारे कारखाने निघणें शक्य आहे.

तसेंच पडिक व खार जमिनी शेतीखाली आणण्याचे दृष्टीनें संशोधनात्मक प्रयत्न होणें आवश्यक आहे.

बागायती—फळें व भाज्या यांच्या उत्पादनास प. महाराष्ट्रांत फारच वाव आहे. रत्नागिरीचा जगप्रसिद्ध हापूस आंबा, फणस, अननस, काजू व नारळ इत्यादींची पैदास पश्चिम किनाऱ्यावर सुसंघटित पद्धतीनें झाल्यास निर्यातरूपानें बहुमोल परदेशी चलन कमाविणें शक्य होईल. विहिरींचें पाणी व कालवे यांचे साहाय्यानें पुणें, नाशिक, नगर, कोल्हापूर वगैरे जिल्ह्यांत फळबागा वाढविणें शक्य आहे.

फळें व भाज्या या नाशवंत चिजा असल्यामुळें खास करून हंगामी फळांच्या "कॅनिंगचा" धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू होणें फायद्याचें आहे. कैकवेळां भरघोस पैदास होऊनहि वाहतुकीच्या व अन्य अडचणींमुळें फळफळावळ नासण्याची वा मातीमोलानें पैदासिच्या केंद्राजवळ विकण्याची भीति असते. या दृष्टीनें रेफ्रिजरेटेड व्हॅन सर्व्हिस उपलब्ध असणें हितावह आहे. मुरांबे, जॅम्स, लोणचीं, रस वगैरे रूपानें हीं फळें हवाबंद डब्यांतून सांठविण्याची मोठ्या प्रमाणावर सोय हवी. कॅनिंग केलेलीं फळें हीं दूरवर पाठविणें अथवा निर्यात करणें शक्य असल्यास फायद्याचें आहे.

खतें—अन्नधान्याचीं व इतर पिकें, त्याचप्रमाणें फळफळावळ व भाज्या यांची भरपूर पैदास होण्यासाठी खतें वापरण्याच्या बाबतींत संशोधन व मार्गदर्शन होणें जरूर आहे. रासायनिक खतें वापरण्याला उत्तेजन मिळालें पाहिजे. हीं खतें थोड्या किंमतींत उपलब्ध झालीं पाहिजेत. कराडजवळ कोयनेची वीज वापरून "अमोनिअम् सल्फेट" या रासायनिक खताचा कारखाना व ठाणा-दिव्याचे नजिक हाडांपासून "सुपर फॉस्फेट" खताचा कारखाना चालू करणें सहजसुलभ आहे. यामुळें वाहतुकीची अडचण विशेष न भासतां भरपूर प्रमाणांत व योग्य किंमतींत खतें पुरविणें सोईचें होईल.

खनिज संपत्ति—वसईजवळ तुंगार टेकड्यांच्या विभागांत व कोल्हापूरजवळ बॉक्साइट (Bauxite) हें खनिज सांपडत असून त्यापासून विजेच्या साहाय्यानें अल्युमिनिअम् बनविण्याचे कारखाने निघूं शकतील. त्याचप्रमाणें दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यांत रेडीजवळ लोखंडाचें खनिज (Iron ore) सांपडतें. हें खनिज निर्यात करण्याच्या दृष्टीनें बंदरांची अगर धक्क्याची व्यवस्था झाल्यास परदेशी चलन कमविण्याचें एक उत्तम साधन हातीं येऊं शकेल. रेडीचे आसमंतांत मँगनीजहि मिळूं शकतें. सावंतवाडीजवळ रंगकामास उपयुक्त अशी रंगीत माती उपलब्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत इल्मनाइट हें अणुखनिजहि सांपडतें.

पश्चिम महाराष्ट्राच्या भूगर्भाची पहाणी ज्या आस्थेवाईक पद्धतीनें व्हावयास हवी तशी अजून झालेली नाहीं. सरकारनें पद्धतशीरपणें (Geological and Mineral Survey) केल्यास महाराष्ट्रांतील आजपर्यंत गुप्त राहिलेली खनिजसंपत्ति भूगर्भाबाहेर येणें शक्य होईल.

जंगलसंपत्ति—प. महाराष्ट्रांत डांग, खानदेश व ठाणें या जिल्ह्यांतच उल्लेखिण्याजोगीं जंगलें उरलेलीं आहेत. या भागांत पद्धशीरपणें "वनमहोत्सव" आरंभून जंगलें वाढविणें आवश्यक आहे. या गोष्टीकडे जंगलखात्यानें उत्साहपूर्वक लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. हें न केल्यास कालांतरानें हींहि जंगलें संपुष्टांत येवून त्याचे अनिष्ट परिणाम सर्वांस भोगावे लागतील.

निरनिराळ्या तऱ्हेच्या मऊ लांकडापासून कृत्रिम रेशीम (Rayon) कागद वगैरे तयार करणारे कारखाने सुरू करणें शक्य आहे. या दृष्टीनें डांगच्या जंगलांत बांबूंची अमाप पैदास होते त्याचा यथार्थ उपयोग करून घेणें किफायतीचें होईल. त्याचप्रमाणें जंगलांत हिरडाहि विपुल होतो. त्यापासून चामड्यांच्या धंद्यांत लागणाऱ्या टॅनिंग एक्स्ट्रॅक्टचे कारखाने काढणें शक्य आहे. तसेंच वुड डिस्टिलरी सुद्धां सुरू करणें फायद्याचें होऊं शकेल.

खानदेशच्या जंगलांत महुवा फुलांपासून अल्कोहोल व चिंचोक्यांपासून स्टार्च बनविणें शक्य आहे.

सागरी संपत्ति—प. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर मच्छीमारीचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. या धंद्याकडे राज्य सरकार आतांशा अधिक लक्ष पुरवूं लागलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. मासे व कॉडलिव्हर ऑईल, शार्क लिव्हर ऑईल, या माशांचे तेलांचा चांगला पुरवठा येथें हाऊं शकतो. माशांचें तेल काढण्याचे कारखाने त्याचप्रमाणें मासे सीलबंद डब्यांत सांठविण्याचे (कॅनिंगचे) कारखाने पश्चिम किनाऱ्यावर निघणें सहज शक्य आहे.

ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत मिठागरांचा धंदा जोरांत चालत आहेच. मिठापासून सोडा ॲश (धुण्याचा सोडा), कॉस्टिक सोडा व क्लोरीन तयार करण्याचे कारखाने उरण, चिपळूण वगैरे ठिकाणीं चालूं करतां येण्यासारखे आहेत.

पश्चिम किनाऱ्यावर पांचशें टनांपर्यंतच्या लहान बोटी, गलबतें व जहाजें बांधण्याचा कारखाना चालूं करण्यासारखा आहे. या दृष्टीनें रत्नागिरी हें सोयीस्कर ठिकाण वाटतें.

---

**पश्चिम जर्मनीसाठीं कनेडियन विमानें**—पश्चिम जर्मनीच्या सरकारनें कॅनडामधील एका विमानाच्या कारखान्याकडून जेटवर चालणारीं २२५ लढाऊ विमानें विकत घेण्याचें ठरविलें आहे. त्यांची किंमत ७॥ कोटी डॉलर्स होईल. कॅनडांतील कारखान्यानें एकदम इतकीं विमानें देण्याविषयीं केलेला हा मोठ्यांत मोठा करार आहे.


## कण आणि क्षण

ह्या अत्यंत लोकप्रिय (दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या) पुस्तकाचे कर्ते श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

## पुढे पाऊल

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.

पृ. सं. १३२] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [किंमत २ रु.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.